# नूतन कला महाविद्यालय राजापूर

## भूगोल पर्यावरण विभाग

### अभ्यास सहल अहवाल २०२२-२३

अनुकमणिका

1) प्रस्तावना
अ) शैक्षणिक सहलीचा हेतू
ब) शैक्षणिक सहलीचा प्रवासमार्ग

2) सहल प्रदेशातील भौगोलिक माहिती

3) सहल प्रदेशातील आर्थिक घटक

4) औरंगाबाद भेटी दरम्यान पाहिलेली शैक्षणिक, धार्मीक, सांस्कृतिक, एतिहासिक ठिकाणे

**ऋणनिर्देश**

सावित्रीबाई फुले पुणे  विद्यापीठाच्या SYBA/ BCOM/BSC पर्यावरण या विषयाची अभ्यास सहल सहल संगमनेर – औरंगाबाद ठिकाणी दि. २९/१२/२०२२ अखेर जाऊन आली. या अभ्यास सहलीचे संयोजन व मार्गदर्षन मा. सह प्राध्यापक रविंद्र गोफणे व सह प्राध्यापक अमोल खरात . यांनी केले. त्यांच्या भौगोलिक मार्गदर्शनामुळे आम्हाला सहलीचा आनंद घेता आला. त्यांच्या मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचा/त्यांची त्रृणी आहे.प्रागतिक शिक्षण संस्था व मा. प्राचार्य डॉ. सुभाष कडलग यांनी सहलीला
परवानगी दिली व सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचा /त्यांची अत्यंत आभारी
आहे. कार्यालयीन कर्मचारी व सेवक यांनीही सहकार्य केले त्याबद्दल त्यांचेही आभार.

विद्यार्थाची सही

नाव

रोल. नं. परीक्षा नं.

## १. प्रस्तावना


## अ) शैक्षणिक सहलीचा हेतू

भूगोलशास्त्रामध्ये सहलीला अनन्य साधारण महत्व आहे. सहलीमध्ये प्रवास मार्गातील नैसर्गिक व मानवी घटकांचे निरीक्षण केले जाते. विविध भोगोलिक घटक (मृदा, वनस्पती,भूपृष्ठरचना,नदीप्रणाली इ.) व सांस्कृतिक घटक ( वसाहती, उद्योगधंदे, पेहराव, भाषा शैली इ.) यांचा अभ्यास अभ्यास सहलीमध्ये प्रत्यक्षरित्या करता येतो. विविध प्राकृतिक घटकांचा मानवी जीवनावर होणारा परिणाम व मानवाने निसर्गामध्ये घडवून आणलेला बदल यांच्या विषयीचे सखोल व प्रत्यक्ष ज्ञान अभ्यास सहलीमुळे प्राप्त होते. शैक्षणिक सहल त वेगवेगळया प्रदेशाचे निरीक्षण करून भौगोलिक व सांस्कृतिक घटकांचा अभ्यास पुस्तकी माहितीपेक्षा प्रत्यक्ष अभ्यासातून चांगल्या पध्दतीने होऊ शकतो. शैक्षणिक सहलीमुळे व्यक्तिमत्त्वाचा विकास व नेतृत्व हे गुण अंगी बाळगले जातात. भूगोल शास्त्राचा अभ्यास पुस्तकातील माहिती व क्षेत्रीय अभ्यास अशा दोन प्रकारे केला जातो. शैक्षणिक सहल ही प्रत्यक्ष क्षेत्रीय अभ्यासाचा एक भाग आहे. पुस्तकात वाचून एखादया घटकाची माहिती घेण्यापेक्षा जर त्याचे प्रत्यक्ष निरीक्षण केले तर ती माहिती कायमस्वरूपी स्मरणात राहते. असे विविध उद्देश अभ्यास सहलीमुळे साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो. व त्यापासून होणा-या विविध फायद्यामुळे शैक्षणिक सहलीला विशेष महत्व आहे.

**ब) शैक्षणिक सहलीचा प्रवासमार्ग :**

संगमनेर- देवगड - णेवासा -औरंगाबाद असा झाला व दि. २९/१२/ २०२२ रोजी पहाटे 6.00 वाजता संगमनेर ते औरंगाबाद प्रवास

वरील प्रवासात विविध भौगोकिदृष्टया महत्त्वाच्या स्थळांना भेटी दिल्या. त्या प्रदेशातील नैसार्गिक, सांस्कृतिक, ऐतिहासीक व अर्थिक घटकांचा पर्यावरणापेक्षा भिन्न असल्यामुळे तुलनात्मक अभ्यासाच्या दृष्टीने हा प्रदेश निवडण्यात आला.



# २. सहल प्रदेशातील भौगोलिक माहिती

## भौगोलिक माहिती

छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रामुख्याने गोदावरी नदीचे खोरे येथे आहे आणि काही भाग तापी नदीच्या खोरेच्या उत्तर पश्चिमेला आहे. हा जिल्हा सामान्य खाली पातळी दक्षिण आणि पूर्व दिशेने आहे आणि उत्तर-पश्चिम भाग पूर्णा-गोदावरी नदीच्या खोऱ्यात येतो. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे उत्तर रेखांश (पदवी) १९ आणि २० आणि पूर्व देशांतर (पदवी) ७४ ते ७६ आहे.

**वन :**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एकूण वनक्षेत्र १३५.७५ चौ.कि.मी. आहे. महाराष्ट्राशी तुलना करता छत्रपती संभाजीनगरचे जंगल क्षेत्र ९.०३ % आहे.

**माउंटन :**

तीन पर्वत म्हणजे १) अँटूर – त्याची उंची ८२६ मीटर आहे. २) सटाऊन – ५५२ मीटर ३) अब्बासगड – ६७१ मीटर आणि अजिंठा ५७८ मीटर दक्षिण भागाची सरासरी उंची ६०० ते ६७० मीटर्स आहे.

**नद्या :**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील मुख्य नद्या गोदावरी आणि तापी तसेच पूर्णा, शिव, खम आहेत. दुधा, गलहती आणि गिरजा या नद्या गोदावरीच्या उपनद्या आहेत.

**क्षेत्र :**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १०,१०० चौ.कि.मी आहे, त्यापैकी १४१.१ चौ.कि.मी. शहरी क्षेत्र आणि ९,९५८.९ चौ.कि.मी. ग्रामीण क्षेत्र आहे.

**हवामान :**

छत्रपती संभाजीनगर मध्ये पावसाळी हंगाम जून ते सप्टेंबर- आणि ऑक्टोबर ते फेब्रुवारी-हिवाळी हंगाम आणि मार्च ते मे उन्हाळी हंगामापासून सुरू होतो. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे सरासरी पाऊस पडणे ७३४ मिमी आणि किमान तापमान ५.६ डी.सी. आहे. कमाल तापमान ४५.९ डीसी आहे.

**भाषा :**




छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात २०११च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येची ३७,०१,२८२ लोकसंख्या आणि मुख्यतः मराठी, हिंदी, इंग्रजी आणि उर्दू भाषा बोलली जाते.



## अर्थव्यवस्था

प्रोझोन मॉल औरंगाबाद

गुजरात आणि सिंधमधील व्यापारी ठाण्यांना दक्षिण भारताच्या व्यापारी केंद्रांशी जोडणारा महत्त्वाचा मार्ग औरंगाबाद जात होता. याच मार्गावरचा महत्त्वाचा थांबा म्हणून औरंगाबाद विकसित झाले असावे असे मानता येते. शहरात गुजराती व्यापारी समाजाचे वास्तव्य ऐतिहासिक काळापासून आहे. कापूस लोकर आणि वनस्पतीजन्य तेलांचा व्यवसाय इथे ऐतिहासिक काळापासून चालतो


## औरंगाबाद पर्यटन स्थळे

| | | |
|---|---|---|
| वेरूळ लेणी | बौद्ध, जैन व हिंदू त्रिवेणी संगम असणारी लेणी म्हणजेच एलोरा/ वेरूळ लेणी.येथे पवित्र असे कैलास मंदिर, गौतम बुद्ध व जैन धर्मीय २३ वे तीर्थकार पार्श्वनाथ यांची विशाल शिल्प मूर्ती बघायला मिळते.हि लेणी विशाल काय एक संलग्न खडकात कोरलेली आहे . येथे ऐकून ३४ लेण्या आपणास बघायला मिळतात |  |
| घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग | घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग हे भारतातील १२ वे आणि अंतिम ज्योतिर्लिंग. भक्त घुश्मा च्या विनंती मुळे भगवान शिवशंकर येथे पावन झाले.हे ज्योतिर्लिंग जगप्रसिद्ध वेरूळ लेणी जवळ आहे. त्यामुळे येथे भाविक पर्यटकांची नेहमीच वर्दळ असते.ज्योतिर्लिंग मध्ये शिवशंकारचे पौराणिक मंदिर आहे व जवळच “ पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शिवालय तीर्थ कुंड” आहे. |  |
| *भद्रा मारुती मंदिर* | भद्रा मारुती मंदिर हे प्रसिद्ध हिंदू धर्मीय हनुमान मंदिर आहे. येथील हनुमानजीची मूर्ती शयनावस्थेत आहे.प्रत्येक हनुमान जयंती, चैत्र पौर्णिमेच्या दिवशी राम नवमी, श्रावण महिन्यात आणि हिंदू सणाच्या शुभ प्रसंगात येथे प्रचंड प्रमाणात भाविक गर्दी असते.भाविकांनी घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिराच्या दर्शनास आल्यावर ह्या पवित्र स्थळावर भाविक भेट देतात. |  |
| गौताळा औटराम घाट अभयारण्य | निसर्गाची सहल करायची म्हटले की गौताळा औटराम घाट अभयारण्य नक्कीच बघावे.चंदनाची झाडे अभयारण्यात बिबटे, हरीण, नीलगाय, ससे, मोर, लांडगे, चितळ, तरस, कोल्हे, काळवीट, रानडुकरे, सांबर, गवे, भेकर असे प्राणी आहेत.पशुपक्षी, वृक्षवेली आणि वनौषधी यांनी गौताळा अभयारण्य समृद्ध आहे. येथे प्रसिद्ध असे सिताखोरी धबधबा बघायला मिळतो.येथे नैसर्गिक दृश्य टिपण्यासाठी पर्यटक या ठिकाणी येत असतात. |  |

| | | |
|---|---|---|
| औरंगजेबाची कबर | शेख जैनुद्दीनच्या दर्ग्या मध्ये मोगल सम्राट औरंगजेबाची कबर बनवण्यात आली होती.एवढ्या मोठ्या सम्राटाची एवढी साधी कबरीपुढे औरंगझेबाचा साधेपणा लगेच जाणवतो.कारण हि कबर बनवण्यासाठी स्वत: कमावलेल्या टोपी शिवण्याच्या कामातून मिळालेल्या आठ रुपयात त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्या गुरु शेख जैनुद्दीनच्या जवळच त्यांची कबर बांधली गेली. हे ठिकाण खुलताबाद जवळ आहे . |  |
| दौलताबाद किल्ला | भारतातील कोणत्याही राजाला जिंकता न आलेला किल्ला राजा भिल्लमा पाचवा याने बांधलेला दौलताबादचा देवगिरी किल्ला होय.सभासदाने याचे वर्णन “ दुर्गम दुर्ग देवगिरी हा पृथ्वीवरील चखोट गड खरा परंतु तो उंचीने थोडका ”असे केलेले आहे. किल्ल्याचा सुरक्षतेच्या दुर्ष्टीने खूप महत्वचा किल्ला म्हणून ओळख आहे. येथे स्वातंत्र प्राप्तीचे प्रतिक भारतमाता मंदिर बघायला मिळते |  |
| *जायकवाडी धरण* | महाराष्ट्राचा सर्वात मोठा बहुदेशीय प्रकल्प आणि आशिया खंडातील सर्वात मोठे मातीचे धरण म्हणून प्रसिद्ध असे जायकवाडी धरण छत्रपती संभाजीनगर ची जलवाहिनी चे कार्य करते.नाथसागर जलाशय मध्ये आठवडी सुट्टीचा आनंद तलावा ठिकाणी घेण्यासाठी हे ठिकाण योग्य आहे. |  |

# छायाचित्र





## सारांश

अभ्यास सहलीच्या दरम्यान आम्ही पुढील गोष्टी अभ्यासल्या.

1) औरंगाबाद शहरातील  हवामानातील फरक प्रत्यक्ष अनुभवला.
२) पर्वतीय प्रदेशातील विविध भूआकार शेती, वसाहती इ. अध्ययन केले.
3) ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाच्या दौलताबाद किल्ल्यास भेट दिली.
4) ज्वालामुखीमुळे निर्माण झालेले काही भोगोलिक घटक पाहिले.

या प्रकारे या अभ्यास सहलीमध्ये वर्गातून अभ्यासल्या जाणा-या विविध भौगोलिक व ऐलिहासिक घटकांचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन त्यांच्या विषयी जास्तीत जास्त माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला.

सदर अभ्यास सहलीत SYBA 46  SYBCOM 66 SYBSC 44  विद्यार्थी सहभागी झाले होते.

भूगोल व पर्यावरण विभाग